GAD/RC/F.No.41
**Maharashtra State Electricity Distribution Co.Ltd.**
Estrella Batteries Expansion Building,
Ground Floor, Plot No. 1, Dharavi Road
Matunga, **Mumbai – 400 019**.

MAHAVITARAN

# ADMINISTRATIVE CIRCULAR NO. 247 DATE 08/09/2009

Sub : Filling in the posts of Pay Gr.III & IV categories from amongst the Project Affected Persons.

Read: Adm. Circular No.361 dated 14/06/2001.

……

The Govt. of Maharashtra vide Circular No.Prakalp-1000/PK-27/2000/16A dated 13/09/2000 has prescribed the procedure for filling in the 5% posts in Pay Gr.III & IV categories from amongst the Project Affected Persons and the same was circulated vide Adm.Circular No.361 dated 14/06/2001 for implementation by the appointing authorities.

2. The erstwhile MSEB has imposed ban on filling in the Pay Gr.III & IV category posts by way of direct recruitment. Now, the Board of Directors vide their Resolution No.781 dated 16/04/2009 have approved the Staff Norms for field offices and the same have been communicated to the field offices vide Office Order No.4 – GAD/CGM(T/E)/MPR/Staff Norms/14664 dated 16/05/2009.

3. Now, the Govt. of Maharashtra vide Circular dated 18/07/2008 has given directives that the orders dated 31/03/2008 of the Hon'ble High Court, Bench at Aurangabad in the Writ Petition No.7472/2007 be implemented and the exercise of identifying the vacancies and filling those all over the State and with all appointing authorities should be completed within a period of 18 months from the date of decision. The copy of the Circular is attached herewith for ready reference.

4. In view of the above facts, all the appointing authorities are hereby instructed to work out the vacancies earmarked for direct recruitment in Pay Gr.III & IV Non-technical categories as per the new Norms communicated vide Office Order No.4 dated 16/05/2009. Out of these vacancies, 5% vacancies are to be filled in from the Project Affected Persons which is a statutory provision and the orders of the Hon'ble High Court will also be implemented. The other liabilities like cases of eligible dependents of the deceased employees, absorption of surplus employees against Non-Technical posts is to be done from the remaining 95% vacancies

5. All the appointing authorities are directed to take note of the orders of the Govt. of Maharashtra and Hon'ble High Court and follow the same scrupulously. The process of appointing the 5% vacancies reserved for Project Affected Persons in Pay Gr.III & IV Non-technical category posts if any is to be completed before 30/09/2009 so as to avoid any legal complications. The Chief Engineers in the field shall monitor

the process of implementation of Orders of the Hon'ble High Court by the appointing authorities under their jurisdiction. In nutshell the following shall be taken by the Appointing Authorities :-

i) On the basis of vacancies in Pay Group III & IV categories (Non-Technical), the reservation for the Project Affected Persons is to be worked out.

ii) The requisition specifying qualification and experience for the post is to be submitted to Collector/Resettlement Officer for sponsoring the names of the eligible candidates from the seniority.

iii) The posts identified for PAPs are not to be advertised but to be filled in from amongst the eligible PAPs sponsored by the Collector/Resettlement Officer without any Competitive Examination

6. This Administrative Circular shall come into force with immediate effect.

7. This Administrative Circular is also available on Company's website i.e. www.mahadiscom.in.

**(S.V. Patil)**
**Chief General Manager (P)**

To

All as per mailing list upto the level of
Executive Engineer and above of MSEDCL

प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना शासकीय सेवेतील गट "क" व गट "ड" मधील पदांवर नियुक्ती देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग,

शासन परिपत्रक क्रमांक: न्यायप्र-१००८/७/प्र.क्र.५८/०८/(भाग-२)/१६-अ,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक:- १८ जुलै, २००८.

वाचा:- १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक:आरपीए-१०७१/१७७७८५/र-१, दि. २०/११/१९७३,

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:एईएम-१०८०/३५/१६-अ, दि.२१/१/१९८०,

३) शासन परिपत्रक, सा.प्र.वि, क्रमांक:प्रानिम-१२९६/प्र.क्र.१४९/९६/१३-अ, दि.३/१/१९९७,

४) शासन परिपत्रक, सा.प्र.वि, क्रमांक:प्रकल्प-१०००/प्र.क्र.२७/२०००/१६-अ, दि.१३/९/२०००,

५) शासन परिपत्रक, सा.प्र.वि, क्रमांक:प्रकल्प-१००१/१०९/प्र.क्र.१३/२००१/१६-अ, दि. ७/४/२००१,

६) शासन परिपत्रक, सा.प्र.वि, क्रमांक:प्रकल्प-१००२ /मुस-१४२ /प्र.क्र.२४ /२००२ /१६-अ, दि. २ ऑगस्ट, २००२,

७) शासन परिपत्रक, सा.प्र.वि, क्रमांक:प्रकल्प-१००१ /१०९ /प्र.क्र.१५४ /२००१ /१६-अ, दि.२३/१०/२००२,

८) शासन निर्णय, सा.प्र.वि, क्रमांक:विसआ-१००१/६०/प्र.क्र.१३९/०१/(भाग-१)/१६-अ, दि. ३० मे, २००३,

९) शासन परिपत्रक, सा.प्र.वि, क्रमांक:संकीर्ण-१००३/प्र.क्र.९६/०३/१३-अ, दि. १९/११/२००३,

१०) शासन परिपत्रक, सा.प्र.वि, क्रमांक:न्याप्र-१००३/९९/प्र.क्र.२/०३/१६-अ, दि. ५ एप्रिल,२००५,

११) शासन परिपत्रक, सा.प्र.वि, क्रमांक:एसआरव्ही-२००५/प्र.क्र.४७/०५/१२, दि.२५ ऑगस्ट,२००५,

१२) शासन परिपत्रक, सा.प्र.वि, क्रमांक:न्याप्र-१००३/९९/प्र.क्र.२/०३/(भाग-२)/१६-अ, दि.२५/१०/२००५.

<u>प्रस्तावना:-</u>

श्री. सुनिल एकनाथ पाटील उर्फ चौधरी, प्रकल्पग्रस्त यांनी, जिल्हाधिकारी, जळगांव यांचेकडून दिनांक १७/८/२००७ रोजी लिपिक-नि-टंकलेखक व तलाठी ही पदे भरण्यासाठी दिलेली जाहिरात रद्द करण्याबाबत व श्री. पाटील यांना जिल्हाधिकारी, जळगांव यांनी प्रकल्पग्रस्तांसाठी ठेवलेल्या ज्येष्ठता यादीनुसार प्रकल्पग्रस्त यांच्यासाठी असलेल्या ५% समांतर आरक्षण कोटयामधून नियुक्ती मिळणेबाबत विनंती केली होती. तसेच त्यांनी महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसनासाठीचा सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ मधील कलम १० चा उपकलम ६ मधील खंड (अ) व (ब) मधील तरतुदीनुसार प्रकल्पग्रस्तांसाठीच्या ५% पदांवर इतरांची नियुक्ती करण्यास प्रतिवादींना प्रतिबंध करण्यात यावा, अशीही विनंती मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका क्रमांक ७४७२/२००७ दाखल करुन केली होती. या याचिकेवर मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी दिनांक ३१/३/२००८ रोजी आदेश दिलेले आहेत.सबब, आदेशांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

( कृ.मा.प.)

**शासन परिपत्रक:-**

वर नमूद केलेल्या प्रकरणी मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी दिलेल्या दिनांक ३१/३/२००८ रोजीच्या आदेशातील कार्यान्वयीन भाग सोबत जोडलेल्या परिशिष्ट- एक मध्ये दिलेला आहे. तो थोडक्यात खालील प्रमाणे आहे:-

"अ) प्रकल्पग्रस्तांना ५% प्राथम्य कोटा ठेवला असल्यामुळे त्यांनी जाहिरातीला अनुसरुन खुल्या बाजारातील उमेदवारांप्रमाणे अर्ज करण्याची आवश्यकता नाही आणि खुल्या बाजारातील उमेदवारांशी स्पर्धा करण्याचीही आवश्यकता नाही. त्यांची ज्येष्ठतेप्रमाणे नियुक्ती करण्यात यावी.

ब) दिनांक १७/८/२००७ रोजीच्या जाहिरातीस अनसुरुन प्रतिवादींनी प्रकल्पग्रस्तांशी संबंधित भरती केली असल्यास ती भरती रद्दबातल ठरविण्यात येत आहे.

क) मा. उच्च न्यायालयाचा निर्णय मा.मुख्य सचिव यांना सादर करुन महाराष्ट्र प्रकल्पबाधीत व्यक्तिचे पुनर्वसनासाठीचा सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम १० चा उपकलम ६ मधील खंड (अ) व (ब) मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांना खालीलप्रमाणे निदेश देण्यात यावेत:-

१) प्रत्येक विभागांतर्गत सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी वर्ग-३ व वर्ग-४ (गट-क व गट-ड) (अतांत्रिक) च्या संवर्गाची एकूण संख्या निर्धारित करावी. त्यापैकी प्राथम्यक्रमानुसार प्रकल्पग्रस्तांसाठी किती पदे उपलब्ध होतात व त्यापैकी किती पदे रिक्त राहिली आहेत हे निश्चित करावे.

२) प्रकल्पग्रस्तांसाठी निश्चित केलेल्या व त्यापैकी रिक्त असलेल्या पदांवर प्रकल्पग्रस्तांची नियुक्ती करण्यासाठी सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी/पुनर्वसन अधिकारी यांचेकडे नोंदणी झालेल्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांच्या नांवांची ज्येष्ठतेनुसार यादी मागवावी आणि जे प्रकल्पग्रस्त उमेदवार नियमानुसार नियुक्तीसाठी पात्र ठरतात त्यांचे ज्येष्ठता यादीनुसार नियुक्तीचे योग्य ते आदेश निर्गमित करावेत. नियुक्तीचे आदेश काढताना सामाजिक आरक्षणाचा योग्य विचार करुन संबंधित आरक्षित प्रवर्गाच्या रिक्त पदावर त्या प्रवर्गातील ज्येष्ठता यादीनुसार पहिल्या क्रमांकाच्या प्रकल्पग्रस्त उमेदवाराची नियुक्ती करावी.

३) आता येथून पुढे प्रकल्पग्रस्तांसाठीची रिक्त पदे भरण्यासाठी जाहिरात देण्याची गरज नाही. प्रकल्पग्रस्तांच्या नेमणुका शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांनुसार संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवाराची पात्रता तपासून व जिल्हाधिकारी/पुनर्वसन अधिकारी यांनी प्रकल्पग्रस्तांच्या ठेवलेल्या ज्येष्ठता यादीनुसार काटेकोरपणे परंतु कोणत्याही स्पर्धात्मक परीक्षेशिवाय करण्यात याव्यात.

४) प्रकल्पग्रस्तांसाठीची रिक्त पदे निश्चित करणे व ती भरण्याची कार्यवाही राज्यातील सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी आदेशाच्या म्हणजेच दिनांक ३१/३/२००८ पासून १८ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करावी.

प्रचलित याचिकेमध्ये वादी नसलेले राज्यातील सर्व प्रकल्पग्रस्त यांना सदर निर्णयातील निरीक्षणे व निर्देशांचा लाभ मिळेल."

वरीलप्रमाणे मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी प्रकल्पग्रस्तांच्या नियुक्त्या कराव्यात.

सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शासकीय/निमशासकीय इत्यादी कार्यालयांना या शासन परिपत्रकानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना तात्काळ द्याव्यात.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २००८०७१८१२४८२७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( दि. श. ढिंगळे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव.
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री, राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव,
शासकीय अभियोक्ता, उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद,
*प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
*प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
*प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,
*प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,(विधान सभा) विधानभवन, मुंबई.
*सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,(विधान परिषद) विधानभवन, मुंबई.
*सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व मुख्याधिकारी, नगर परिषदा/नगरपालिका,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालयीन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख /कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती
* पत्राने.

## परिशिष्ठ- एक

( शासन परिपत्रक क्रमांक:न्यायप्र-१००८/७/प्र.क्र.५८/०८/(भाग-२)/१६-अ, दि. १८ जुलै,२००८ चे सहपत्र )

We, therefore, allow the writ petition although not strictly in terms of prayer clauses.

(1) We uphold the contention advanced on behalf of the petitioner that so far as appointments of PAPs to 5% priority quota, they are not required to apply, as if open market candidates; in response to an advertisement nor they are required to compete with open market candidates. They are also not required to compete between themselves and ordinarily they should be appointed in order of seniority. The only occasion for making and exception would be for observation of compartmentalised reservations e.g. if there are 10 posts in a department for PAPs category and 5 posts are already filled in by open category and, therefore, there are vacancies only of reserved category, open category PAP in the wait list will have to make a room for candidate below him of reserved category.

(2) The recruitment, if any, carried out by the respondents pursuant to advertisement dated 17.8.2007, so far as it relates to PAPs category, must be held vitiated and quashed.

(3) In the light of view taken by us as above, it is desirable to direct learned A.G.P. to place a copy of this judgement before the Chief Secretary of the state for appropriate directions to all appointing authorities referred in causes (a) and (b) of sub-section (6) of section 10 of Act XI of 2001. They should be directed to :

(i) Take an assessment of total cadre strength in Class III and IV (Class ' C ' and ' D ') (non technical) of each Departments, find out how many seats are available to PAPs as 'priority quota' and how many are vacant.

(ii) For vacancies identified, all the appointing authorities should ask for the names of PAP candidates registered with Collector/Resettlement officer, who are eligible for appointment as per rules (by giving due consideration to social reservations i.e. to vacancies of reserved category, the first candidate from that category in the seniority list should be sponsored) and issue appropriate appointment orders to such candidates sponsored from seniority list.

(iii) Now onwards there should be no need to advertise the vacancies available for PAPs and appointments of PAPs should be carried out strictly in accordance with the instructions so far issued by the Government from time to time, i.e. strictly from the seniority list maintained by Collector/ Resettlement Officer on verifying the eligibility according to rules for the post and without any competitive examination.

(iv) The exercise of identifying the vacancies and filling those, all over the State and with all appointing authorities, should be completed wihin a period of 18 months from today.

(4) Needless to say that benifit of observations and directions in this judgement should be available to all the PAPs irrespective of the fact that they are not party to present petition.

(5) Rule made absolute accordingly.